महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १२२ वे | दिनांक : २७/०४/२०२६ | वार सोमवार

## सत्तांतर झाल्यापासून महापुरुषांचा अपमान करणाऱ्यांची हिंमत वाढली - शशिकांत शिंदे



**पुणे** : नागपूर येथील कार्यक्रमात बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी केलेल्या काही विधानांमुळे नवा वाद निर्माण झाला असून राजकीय व सामाजिक वर्तुळातून त्यावर तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. शास्त्री यांनी हिंदू समुदायाला आवाहन करताना "चार मुले जन्माला घाला आणि त्यातील एक अपत्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला द्या," असे विधान केले. या विधानावरून विरोधकांनी टीका केली आहे. यावर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी देखील ट्विट करत टीका केली आहे.

शशिकांत शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचे आराध्य दैवत नाहीत, तर ते 'हिंदुस्थानचे तख्त' वाचवणारे आणि दिल्लीच्या जुलमी सत्तेला आपल्या पराक्रमाने धडक देणारे युगपुरुष होते.ज्या राजाने शून्यातून स्वराज्य उभे केले,त्या राजाबद्दल अश्लाघ्य वक्तव्ये करून त्यांच्या कर्तृत्वाचा अपमान करण्याचे धाडस अलीकडे वाढले आहे. राज्यात अलीकडच्या काळात सत्तांतर झाल्यापासून महापुरुषांचा अपमान करणाऱ्यांची हिंमत कमालीची वाढली आहे हे सर्व ठरवून केलं जात आहे अशी शंका मनात येते.

सर्वात जास्त संताप या गोष्टीचा येतो की, जेव्हा व्यासपीठावरून बाहेरून आलेले लोक शिवरायांचा अपमान करतात, तेव्हा सत्तेत बसलेली मंडळी त्याच मंचावर माना डोलवत बसलेली असतात! ही कसली शिवभक्ती? महाराजांच्या नावाने मते मागायची आणि त्यांच्याच विटंबनेवर गप्प बसायचे? असा संतप्त सवाल शशिकांत शिंदे यांनी उपस्थित केला.

शशिकांत शिंदे म्हणाले, महाराजांना 'आम्हीच घडवलं' किंवा 'आम्हीच त्यांचे गुरु होतो' असे भासवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न होत आहे. शिवराय स्वयंभू होते आणि राजमाता जिजाऊसाहेबांच्या संस्कारातून घडलेले जाणते राजे होते, हे विसरणाऱ्यांना आता धडा शिकवण्याची वेळ आली आहे. बाहेरून येऊन महाराष्ट्रात आमच्या महापुरुषांचा चुकीचा इतिहास सांगणाऱ्यांना ही शिवप्रेमी जनता आता सोडणार नाही. फुले-शाहू-आंबेडकर आणि शिवरायांच्या विचारांनी घडलेला हा महाराष्ट्र अशा भोंदूगिरीला कधीही थारा देणार नाही, असा कडक इशारा शशिकांत शिंदे यांनी दिला आहे.

## अमेरिका आता स्वत:च 'नरक' बनलीये : प्रियंका चतुर्वेदी



**मुंबई** : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प मुक्कामाला असलेल्या वॉशिंग्टन डीसी येथील हिल्टन हॉटेलमध्ये गोळीबाराची धक्कादायक घटना घडली असून, यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. 'व्हाईट हाऊस करस्पॉंडेंट्स डिनर'साठी ट्रम्प आणि त्यांची पत्नी मेलानिया हॉटेलमध्ये उपस्थित असतानाच बॉलरुमच्या वरच्या मजल्यावर हा गोळीबार झाला. या गोळीबार प्रकरणी शिवसेना ठाकरे गटाच्या खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी ट्विट करत म्हटले की, वॉशिंग्टन डी.सी. येथील 'व्हाइट हाउस करस्पॉन्डन्ट्स डिनर' कार्यक्रमातून काही चिंताजनक दृश्ये आणि गोळीबाराचे आवाज कैद करणारे व्हिडिओ समोर आले आहेत. जग इतक्या वेगाने बदलत आहे की हे बदल समजून घेणेच कठीण झाले आहे.

त्यानंतर पुन्हा एक ट्विट करत प्रियंका चतुर्वेदी म्हणाल्या, अमेरिकेतील बंदुकांची समस्या अत्यंत गंभीर आहे. हा असा एक मुद्दा आहे जो बंदुकांसंबंधी एखादी घटना घडल्यानंतर दरवर्षी चर्चेत येतो.बंदूक हिंसाचाराचा सामना करण्याच्या बाबतीत, अमेरिका स्वत:च प्रभावीपणे एक 'नरक' बनली आहे, असे म्हणत त्यांनी डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला नरक म्हणल्याच्या विधानावर टोला लगावला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील ट्विट करत गोळीबार प्रकरणावर चिंता व्यक्त केली आहे. ते म्हणाले की, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प, फर्स्ट लेडी मेलानिया ट्रम्प आणि उपराष्ट्रपती हे वॉशिंग्टन डीसीमधील घटनेनंतर सुरक्षित आहेत, हे जाणून समाधान वाटले. मी त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा देतो. लोकशाहीत हिंसेला कोणतेही स्थान नाही आणि अशा कृत्यांचा पूर्णपणे निषेध केला पाहिजे, असे मोदी यांनी म्हटले आहे.

## महाराष्ट्र वैद्यकीय परिषद निवडणुकीसाठी मतदान सुरू

**छत्रपती संभाजीनगर** : महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या निवडणुकीसाठी आज, रविवार, २६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदान सुरू झाले आहे. या निवडणुकीद्वारे परिषदेत एकूण नऊ सदस्यांची निवड केली जाणार आहे. छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात (घाटी) मतदारांमध्ये मोठा उत्साह दिसून येत आहे.

सर्वोच्च न्यायालयाने ७ जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या आदेशानुसार ही निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. या निवडणुकीसाठी राज्यभरातून एकूण ६० उमेदवार रिंगणात आहेत, ज्यात प्रामुख्याने तीन पॅनेलचा समावेश आहे. निवडणुकीची अधिसूचना २ फेब्रुवारी २०२६ रोजी शासन राजपत्रात प्रकाशित करण्यात आली होती.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एकूण ४७७८ वैद्यकीय व्यावसायिक मतदानासाठी पात्र आहेत. येथे आयएमए पॅनलकडून डॉ. उज्वला दहिफळे, तर युवा पॅनलकडून वैजापूरचे डॉ. अमोल अन्नदाते प्रमुख उमेदवार म्हणून रिंगणात आहेत. नोंदणीकृत आणि नूतनीकरण केलेले वैद्यकीय व्यावसायिकच या मतदानात भाग घेऊ शकतात.

प्रत्येक मतदाराला एकूण नऊ उमेदवारांना मतदान करण्याचा अधिकार आहे. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी उमेदवारांच्या प्रतिनिधींना मतदान सुरू होण्याच्या एक तास आधी मतदान केंद्रावर उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

वैद्यकीय क्षेत्रातील प्रतिनिधित्व निश्चित करण्यासाठी ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. मतदानाच्या ठिकाणी माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड, शहर अध्यक्ष किशोर शितोळे, राजू वैद्य, जालिंदर शेंडगे, सुरेंद्र कुलकर्णी यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि नेत्यांनी उपस्थिती लावली.

## महाराष्ट्रात व्यवसाय करायचा असेल तर मराठी बोललीच पाहिजे- संजय शिरसाट



**छत्रपती संभाजीनगर** : उबाठाने बोलवलेल्या बैठकीला अनेक जण गैरहजर राहतात कारण त्यांचे मन तिथे रमत नाही. यामागे निश्चित काहीतरी घडामोडी असतील नाही तर उबाठामध्ये जे जात आहे त्यांना जाऊ द्या असे म्हटले नसते, म्हणून असा अंदाज लावायला काही हरकत नाही की उबाठामध्ये लवकरच फुट पडेल असे दिसतंय, असे मंत्री संजय शिरसाट यांनी म्हटले आहे. परंतु पक्षांतर्गत संघर्षाला कोण कारणीभूत आहे हे देखील उबाठाच्या नेत्यांनी पाहिले पाहिजे.

संजय शिरसाट म्हणाले की, मराठीचा वाद कशाला पाहिजे. तुम्ही महाराष्ट्रात राहतात ना तर मराठी बोललेच पाहिजे. कर्नाटकमध्ये गेले तर कर्नाटकची भाषा बंगालमध्ये गेले तर तिथली भाषा शिकता ना? परंतु महाराष्ट्रात वाद का घातला? इथे जर व्यवसाय करत असाल तर मराठी बोलले पाहिजे, मराठी सक्तीची असलीच पाहिजे. त्यांना वेळ हवा असेल तर तो देखील दिला पाहिजे.

संजय शिरसाट म्हणाले की, उद्धव ठाकरे यांनी रात्री वर्षावर जात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली अशी जी काय बातमी येत आहे, ही बातमी खोटी आहे. रात्री भेटण्याचे काहीच कारण नाही त्यांना भेटायचे असते तर ते कधीही भेटले असते. संजय गायकवाड यांचे प्रकरण वाढवणे योग्य नाही. त्यांनी त्या प्रकरणामध्ये माफी देखील मागितली आहे.

संजय शिरसाट म्हणाले की, गुणरत्न सदावर्ते यांच्या मताला आम्हरी किंमत देत नाही. प्रताप सरनाईक यांनी जी भूमिका घेतली आहे ती महाराष्ट्राच्या हिताची घेतली आहे. म्हणून राज ठाकरे किंवा इतर पक्षाचे नेते काय बोलत आहे, याचा काहीही संबंध नाही. सदावर्ते यांनी मुद्दा भरकटवण्याचे काम बंद करावे. हे काही कोणाला स्पेस देण्याचे काम नाही.

संजय शिरसाट म्हणाले की, छत्रपती संभाजीनगरमधील पुंडलिकनगर परिसरात मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी वाढली आहे, यासाठी कठोर कारवाई करण्यात यावी असे मी पोलिस आयुक्तांशी चर्चा केली आहे. मराठवाड्यात अवकाळी आणि गारपीट यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांकडून वसुली करण्यात आलेली नाही, त्यांना मदत करण्यात आली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २७ एप्रिल २०२६


## जल, जंगल, जमिन वाचविण्यासाठीही पक्षांनी मोर्चे काढावेत - कॉम्रेड किशोर ढमाले



**कन्नड (अरुण थोरात) :** राजकीय पक्ष विविध जाती धर्मासाठी मोर्चे आंदोलने करतात. मात्र त्यांना आदिवासी न्याय हक्क, जल जंगल जमिनींसाठी मोर्चे काढण्यात रस नसल्याचे प्रतिपादन सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष तथा सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेचे राज्य संघटक कॉम्रेड किशोर ढमाले यांनी केले आहे. ते कळंकी ता. कन्नड येथे दि. २६ एप्रिल रोजी सत्यशोधक कम्युनिटी पक्ष, सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभा, यांच्या वतीने आयोजित कन्नड तालुका अधिवेशन प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे राज्याध्यक्ष कॉ. करणसिंग कोकणी, प्रमुख वक्ते म्हणून कॉ. रणजित गावीत, कॉ. रतन मधे, कॉ. रावजी पथवे कॉ. दिलीप गावीत यांनी मार्गदर्शन केले, कॉम्रेड ढमाले पुढे म्हणाले की, राज्यात फोडाफोडीचे राजकारण सुरु आहे. त्यांना वंचित कष्टकरी शेतकर्यांशी काही घेणे देणे नाही. त्यांना स्वताची घरे भरावयाची आहे. लोकवर्गणी करुन निवडून दिलेले हजार कोटी रुपयांची मालमत्ता कशी कमावतात असा सवाल त्यांनी उपस्थित केला. शक्ती कारखानदारांना मिळेल आपल्याला पीठ सुध्दा मिळणार नाही. हे वास्तव असल्याचे परखड मत व्यक्त केले.या अधिवेशनात वनहक्क दावेदारांच्या वनजमिनीत वनविभाग यांत्रिकरणाद्वारे मशागत करण्यास मज्जाव करीत आहे. त्याविरुद्ध लढा उभारणे, वनहक्क दावेदारांच्या प्रश्नांवर तहसीलदार यांना निवेदने देणे, सत्यशोधक कष्टकरी महिला अधिवेशन नियोजन, महात्मा जोतिबा फुले जन्मद्विशताब्दी निमित्त त्यांच्या विचारांचा जागर करण्यासाठी युवक, विद्यार्थी यांच्या साठी विविध स्पर्धा, कार्यशाळा आयोजित करणे, विविध तालुक्यात दौरे करणे, आदींवर मंथन करण्यात आले. यासाठी सत्यशोधक प्रबोधन महासभा निमंत्रक म्हणून वैभव कतारे तर, विद्रोही सांस्कृतिक चळवळ निमंत्रक म्हणून अरुण थोरात यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कॉ. रावजी पथवे, तालुकाध्यक्ष रतन मधे, जयराम पथवे, दिनकर दाभाडे, वैभव कतारे, अरुण थोरात, कडुबा ननावरे, मेरचंद चव्हाण, बाळे मेंगाळ, पुंडलिक राठोड, कैलास पालोदकर, रेवननाथ सोनावणे, विष्णू थोरात, श्रावण पवार, अरुणाबाई सोनावणे, बुधा उघडे, सोमा आगीवले, सखुबाई मेंगाळ, कौशाबाई पथवे, रेखाबाई मेंगाळ, सीताबाई पथवे, मारुती गांगड, दिनेश चव्हाण आदी उपस्थित होते.

## भारतीय जनता युवा मोर्चा छत्रपती संभाजीनगर शहर उपाध्यक्षपदी राम पेरकर यांची निवड



**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय जनता युवा मोर्चा छत्रपती संभाजीनगर शहर उपाध्यक्षपदी पडेगाव येथील राम पेरकर यांची निवड करण्यात आली.ही नियुक्ती दि. 25 शनिवारी रोजी शहर जिल्हाध्यक्ष राहुल शिवाजीराव दांडगे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.या निवडीबद्दल भाजप शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे अभिनंदन केले व सर्वांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी दीपक भाऊ बनकर, चंद्रकांत पेहरकर, सचिन पेहरकर, सचिन तांबे, ज्ञानेश्वर शिंदे, संदीप सोनवणे, शंकर वाणी, अंकुश मगर, माणिक मगर, कृष्णा सुरे, अनिल सुरे, कारण पांढरे, सागर ब्राम्हकार यांची प्रमुख उपस्थिती होती.

## ...तर देवाभाऊंच्या बायकोला घरचे काम करावे लागेल : करुणा मुंडे



**मुंबई :** परप्रांतीयांनी मुंबई सोडली तर देवाभाऊ अर्थात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बायकोला घरातले काम करावे लागेल, अशी मिश्किल टिप्पणी माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या पत्नी करुणा मुंडे यांनी रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी सक्तीची करण्याच्या मुद्यावर भाष्य करताना केली आहे.

करुणा मुंडे यांनी रविवारी एका वृत्तवाहिनीशी संवाद साधला. त्यात त्यांनी धनंजय मुंडे, रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी भाषेची सक्ती, छत्रपती शिवाजी महाराजांचा कथित अवमान आदी विविध मुद्यांवर आपले मत मांडले. त्या म्हणाल्या, मनसे व भाजप जनतेची दिशाभूल करत आहे. मुंबईतील अनेक परप्रांतीय रिक्षा चालक आहेत. मराठी माणसे या व्यवसायात थोडीशी कमी आहेत. मी धनंजय मुंडे यांच्यासोबत तब्बल २७ वर्षे राहिले. त्यानंतरही मला मराठी नीट येत नाही. २ वर्षांपूर्वी राजकारणात आल्यानंतर मराठी शिकले. मराठी भाषा कठीण आहे. याविषयी मी मुख्यमंत्र्यांना निवेदन देणार आहे. रिक्षा चालकांना मराठीची सक्ती करू नका अशी विनंती मी त्यांना करणार आहे.

परप्रांतीय लोक सोडून गेले तर मुंबई अर्धी रिकामी होईल. मंत्र्यांच्या बंगल्यातही यूपी, बिहारवाले काम करतात. त्यामुळे हे लोक आपल्या राज्यात गेले तर सर्वांना स्वतःचे काम स्वतःच करावे लागेल. देवाभाऊंच्या बायकोलाही काम करावे लागेल, असे त्या म्हणाल्या.

करुणा मुंडे यांनी यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी वादग्रस्त विधान करणाऱ्या धीरेंद्र शास्त्रींचाही खरपूस समाचार घेतला. तसेच आसाराम, बागेश्वर बाबा व अशोक खरात ही भाजप घोषित बाबा असल्याचा आरोपही केला. स्वयंघोषित भोंदूबाबांना राजकीय आश्रय भेटतो. त्यामुळे ते एवढे मोठे होतात. छत्रपती शिवाजी महाराजांविषयी तुम्ही काय बोलणार? तुमच्यासारखे बाबा लोक लोकांमध्ये अंधश्रद्धा पसरवतात. धीरेंद्र शास्त्रींची शिवाजी महाराजांवर बोलण्याची लायकीही नाही. आतापर्यंत अनेक भोंदू तुरुंगात गेले. पण त्यानंतरही त्यांची संख्या कमी होत नाही.

हे बाबा लोक महिलांची तस्करी करतात. मी धीरेंद्र शास्त्रींना आव्हान देते. मी स्वतः ब्राह्मण आहे. मी त्यांना त्यांची लायकी दाखवून देईल. त्यांनी माझ्याशी वन टू वन डिबेटमध्ये येण्याचे धाडस दाखवावे, असे करुणा मुंडे म्हणाल्या.

करूणा शर्मा या मूळच्या मध्य प्रदेशातील इंदूरच्या आहेत. काही कामानिमित्त त्या मुंबईत राहत होत्या. त्यांची व धनंजय मुंडे यांची १९९६ पासून ओळख होती. त्यांच्या मते, ९ जानेवारी १९९८ मध्ये त्या दोघांचा विवाह झाला होता. दोघांनीही आंतरजातीय प्रेमविवाह केला होता. धनंजय व करुणा मुंडे यांना एक मुलगा व एक मुलगी आहे. सर्वात आधी करूणा शर्मा यांचे नाव २०२१ साली समोर आले होते. करूणा यांच्या लहाण बहिणीने धनंजय मुंडेंवर अत्याचाराचे आरोप केले. तेव्हा धनंजय मुंडे यांनी एका पोस्टद्वारे करूणा शर्मा यांच्यासोबतच्या नात्याची कबुली दिली होती. त्यानंतर धनंजय मुंडे आणि करूणा शर्मा यांचे काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २७ एप्रिल २०२६


## अज्ञानाकडून ज्ञानाकडे

शिक्षणाची गंगा
आली आपल्या दारी
चला सर्व शाळेला
राहू नका घरी

अज्ञानाच्या अंधारात
पेटवूया ज्ञानाच्या ज्योती
रोज शाळेला जाऊनी
पाटी पेन्सिल घ्या हाती

सांगून गेले गाडगेबाबा
ज्ञान म्हणजे तिसरा डोळा
धन अक्षराचे मोठे
राहू नये कुणी खुळा

ज्ञानाची कास धरता
प्रगतीचे उघडतिल दारे
देश साक्षर करण्यासाठी
आपण झटुया सारे

साक्षरतेची मशाल घेवूनि
उज्वल भारत घडवूया
अज्ञानातून ज्ञानाकडे
एकजुटीने जाऊया



- रवींद्र व्ही. चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क
9405109103


# जिंतूर पोलिसांची कारवाई मुद्देमालसह चोरट्यास अटक




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** सायबर सेलच्या मदतीने मोबाईलचा शोध घेऊन जिंतूर पोलीसांनी मोटरसायकलचा शोध घेतला व तसेच आरोपीलाही अटक केली आहे या बाबत असे की विलास जनार्दन पवार व ३७ वर्ष रा. डांबरी पोस्ट चितळी पुतळी ता.जि.जालना यांनी दिनांक ०७/०७/२०२५ रोजी जितुर पोलीस स्टेशन येथे फिर्यादी दिली की दि. ०४/०७/२०२५ रोज परभणीहून डांबरी तालुका जिल्हा जालना येथे जाण्यासाठी त्याची मोटर सायकल क्र.होंडा शाईन गाडीवर बसून जिंतूर जवळ मैनापुरी पाटी जवळ आलो असता तिथे एक अनोळखी इसमाने हात दाखवून जय सेवालाल म्हणाला त्यावरून मी गाडी थांबून काय पाहिजे जातीचाच आहे म्हणून गाडी थांबवली व तो मला जिंतूर पर्यंत येऊ द्या म्हणून सांगितल्याने मी त्या गाडीवर बसून घेऊन जिंतूर येथे शिवाजी चौकापर्यंत घेऊन गेलो तिथून शेजारी संबंध आपण नाईन्टी नाईन्टी घेऊ दारू पिऊ असे म्हटल्याने मी दारूच्या दुकानात गेलो व तिथून जेवण करण्यासाठी बस स्टँड समोरील गल्लीत घेऊन गेलो तेथे साडेसात वाजण्याची सुमारास जेवण्यासाठी ऑर्डर देत असताना सदरच्या सोबतच्या अनोळखी इसमाने मोटरसायकल क्र. एम एच २१ सी इ ९२७५ होंडा शाइन व त्यामध्ये ठेवलेला रेडमी कंपनीचा मोबाईल असा एकूण एक लाख दहा हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला म्हणून पोलीस स्टेशन जिंतूर गुं ३७२/ २०२५ कलम ३०३ बी एन एस प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्यात पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कान्स्टेबल दीपक वाटोडे, पोह सुनील राठोड यांनी तपास करून व सायबर सेलचे पोलीस हेड कॉन्स्टेबल गणेश कोटकर व पोह स्वप्निल पोतदार यांनी सी डी आर तांत्रिकदृष्ट्या तपास करून आरोपी निष्पन्न करून आरोपी गजानन सुभाष जाधव वय २६ वर्ष राहणार जांब अंध ता. सेनगाव जिल्हा हिंगोली यास अटक करून यांच्याकडून सदर गुन्ह्यात चोरीस गेलेली मोटरसायकल क्र.एम एच २१ सी इ ९२७५ होंडा शाईन कंपनीची किंमत अंदाजे एक लाख रुपये अशी जप्त केले असून पुढील तपास पोलीस निरीक्षक गजेंद्र सरवदे यांच्या मार्गदर्शनाखाली दिपक वाटोडे करीत आहे.

# परभणीत उष्माघाताने एका व्यक्तीचा मृत्यू, अकोल्यात पारा ४६ वर जाण्याचा इशारा



**मुंबई :** महाराष्ट्रावर सध्या सूर्य कोपल्याचे चित्र आहे. राज्यातील अनेक शहरे उष्णतेच्या तडाख्याने अक्षरशः होरपळून निघत आहेत. विदर्भ व मराठवाड्यासह अनेक शहरांत तापमानाने उच्चांक गाठला आहे. त्यामुळे दुपारपूर्वीच रस्ते सामसूम झाल्याचे दिसून येत आहे. परभणीत उष्माघाताने एका व्यक्तीचा बळी गेला आहे. तर अकोल्यात पारा तब्बल ४६ अंशांवर जाण्याचा इशारा देण्यात आला आहे. या वाढत्या तापमानामुळे काही ठिकाणी शाळांना सुट्टी देण्यात आली आहे.

गत काही दिवसांपासून राज्यातील शहरांच्या तापमानात भयंकर वाढ होताना दिसून येत आहे. विशेषतः अकोल्यातील तापमानात मोठी वाढ झाली आहे. या वाढत्या तापमानामुळे अकोला हे जगातील सर्वाधिक तापमान असणाऱ्या शहरांपैकी एक ठरत आहे. गत २१ एप्रिल रोजी अकोल्यात ४३.६ अंश सेल्सिअस तापमान नोंदवण्यात आले. त्यानंतर २२ एप्रिल रोजी ४३.७ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. त्यानंतर २३ एप्रिल, २४ एप्रिल व २५ एप्रिल रोजी अनुक्रमे ४४.३, ४५ व ४५.६ अंश सेल्सिअस तापमान नोंदवण्यात आले. दिवसागणिक वाढणाऱ्या या तापमानामुळे नागरीक पुरते हैरान झालेत.

परभणीत उष्माघातामुळे शिवाजी बबन कांबळे नामक ३७ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. कांबळे हे नाशिकहून परभणीला आपल्या भावाकडे आले होते. दिवसभर उन्हात फिरल्यानंतर त्यांना चक्कर आली आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या भावाच्या फिर्यादीनुसार, शहरातील नानलपेठ पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेवर शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

लातूर जिल्ह्यातील गोंद्री इथे उष्माघाताने एका ९ महिन्याच्या बाळाचा मृत्यू झाला आहे. शिया गोरे असे बाळाचे नाव आहे. उष्माघाताने मृत्यू झाल्याची ही जिल्ह्यातील दुसरी घटना आहे. यापूर्वी औराद शहाजनी येथील वृद्ध शेतकरी लक्ष्मण भंडारे यांचा उष्माघाताने मृत्यू झाल्याची घटना घडली होती.

जळगाव शहरातील तापमानही रविवारी ४३.३ अंश सेल्सिअसवर पोहोचला आहे. ही यंदाच्या उन्हाळ्यातील सर्वाधिक तापमानाची नोंद आहे. वाढत्या तापमानामुळे जळगावकर उकाड्याने हैरान झालेत. यावर उपाय म्हणून महापालिकेने शहरातील प्रमुख चौकांमध्ये टँकरद्वारे पाणी मारण्याची मोहीम हाती घेतली आहे. यामुळे नागरिकांना थोडासा मिळत आहे. प्रशासनाने नागरिकांना उन्हापासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

मुंबईचा पाराही आज ३९ अंश सेल्सिअसवर पोहोचला होता. हवामान विभागाने रविवारी व सोमवारी मुंबई शहर व उपनगरांत उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला होता. त्यानुसार, आज मुंबईत उन्हाच्या पाऱ्यात मोठी वाढ झाल्याचे दिसून आली. या उन्हापासून वाचण्यासाठी मुंबईकरांनी घरी राहण्यास पसंती दिली.

राज्यातील सर्वाधिक तापमानाची नोंद अमरावतीत झाली आहे. शनिवारी अमरावतीचे कमाल तापमान ४५.६ अंश सेल्सिअस एवढे नोंदवण्यात आले. चिंतेची बाब म्हणजे हवामान खात्याने पुढील २ दिवस शहरात उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. त्यामुळे प्रशासनाने नागरिकांना योग्य ती काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

आदिवासीबहुल नंदरबार जिल्हाही यंदाच्या उन्हाळ्यात चांगलाच तापला आहे. जिल्ह्यात ४१ अंश सेल्सिअस एवढ्या तापमानाची नोंद झाली आहे. कमी आर्द्रतेमुळे जिल्ह्यातील उकाड्याची तीव्रता वाढली आहे. त्याचा मोठा त्रास नागरिकांना होत आहे. दुपारच्या वेळी रस्त्यांवर शुकशुकाट पहायला मिळत आहे. पुढील महिन्यात जिल्ह्यातील तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

नाशिक जिल्ह्यातील थंड हवामानासाठी ओळखल्या जाणाऱ्या निफाड तालुक्यातही यंदा उन्हाचा कडाका चांगलाच वाढला आहे. लासलगाव येथे गेल्या १३ एप्रिलपासून कमाल तापमान सतत ४० अंश सेल्सिअसच्या वर राहात आहे. येथे आज तापमानाने ४२.६ अंश सेल्सिअसचा उच्चांक गाठला. नाशिकच्या मालेगावातही उन्हाचा कडाका वाढला आहे. येथे आज ४३.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २७ एप्रिल २०२६


## इंडूरन्स कंपनीच्या CSR मधून वाघोळा येथे ग्रामविकास प्रकल्प सुरू



**छत्रपती संभाजीनगर :** फुलंब्री तालुक्यातील वाघोळा गावात इंडूरन्स कंपनीच्या सीएसआर (CSR) उपक्रमांतर्गत ग्रामविकास प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आला आहे. सेवक ट्रस्टच्या सहकार्याने राबवण्यात येणाऱ्या या प्रकल्पातून गावाच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल, अशी अपेक्षा आहे.

या प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यात नदीचे खोलीकरण व रुंदीकरण तसेच तलावातील गाळ काढण्याच्या कामाचा शुभारंभ नुकताच करण्यात आला. काही दिवसांपूर्वी आयोजित ग्रामसभेत गावाच्या विकास आराखड्यावर चर्चा करून या कामांचे नियोजन करण्यात आले होते.

या विकासकामांचा शुभारंभ अनिवासी वाघोळाकर आणि ज्येष्ठ सेवानिवृत्त कर्मचारी रावसाहेब येडूबा पाटील गायकवाड, शिवाजी आत्माराम पाटील गायकवाड आणि रामदास महाळणकर यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी बोलताना फुलंब्री कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक विकास पाटील गायकवाड यांनी सांगितले की, गेल्या 17 वर्षांपासून वाघोळा ग्रामविकासासाठी प्रयत्न करत असताना इंडूरन्स कंपनीच्या सीएसआर आणि सेवक ट्रस्टच्या सहकार्याने सुरू झालेला हा प्रकल्प एक महत्त्वाचा टप्पा आहे. यामुळे गावाच्या विकासाला नवी दिशा मिळेल आणि भविष्यात अनेक मूलभूत सुविधा गावकऱ्यांपर्यंत पोहोचतील.

या प्रसंगी इंडूरन्स कंपनीचे प्रतिनिधी उदय दुधगावकर, सुनील शिंदे यांच्यासह बाबुराव गायकवाड, संतोष गायकवाड, रामू गायकवाड, कचरू गायकवाड, श्रीमंत गायकवाड, संजय कावळे, भगवान गायकवाड, जनार्धन गायकवाड, सचिन गायकवाड, रोहिदास थोरात, श्रीराम गायकवाड, पुंजाराम गायकवाड, अनिल गायकवाड, सोपान गायकवाड आदींसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

इंडूरन्स कंपनीने सीएसआर माध्यमातून उचललेले हे पाऊल ग्रामीण विकासासाठी आदर्श ठरत आहे. अशा उपक्रमांमुळे गावांचा शाश्वत विकास शक्य होतो. विकास गायकवाड यांनी सीएसआर अंतर्गत काम करणाऱ्या विविध कंपन्या, संस्था आणि समाजहितैषी व्यक्तींना वाघोळा तसेच पोफळा येथे ग्रामविकासाची कामे हाती घेण्यासाठी आवाहन केले. ग्रामीण भागाच्या प्रगतीसाठी सर्वांनी पुढाकार घेऊन हातभार लावावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## धीरेंद्र शास्त्री स्वतःच्या राज्याचा इतिहास माहीत नसणारा व्यक्ती - संभाजी छत्रपती





**कोल्हापूर :** बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी नागपूरमधील एका कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास स्वामी यांच्याबद्दल केलेल्या विधानामुळे महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. या विधानाचा छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज संभाजी छत्रपती यांनी कडक शब्दांत समाचार घेतला असून, छत्रसाल बुंदेला यांचा दाखला देत, "स्वतःच्या राज्याचा इतिहास माहीत नसणारा व्यक्ती" असे संबोधले आहे. तसेच "अशा भोंदू बाबांना मोठे करणाऱ्या राजकारण्यांना सरळ केले पाहिजे," अशा कडक शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला.

धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी नागपुरातील कार्यक्रमात बोलताना त्यांनी रामदास स्वामी हे छत्रपती शिवाजी महाराज यांचे गुरू होते. तसेच शिवरायांनी मुकुट उतरवून रामदास स्वामींकडे राज्य सोपवण्याची इच्छा केली होती, असा दावा केला. त्यांच्या या दाव्यावर महाराष्ट्रातील राजकीय वर्तुळात संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज संभाजी छत्रपती यांनी देखील सोशल मीडियावर पोस्ट करून धीरेंद्र शास्त्री यांच्यावर टीका केली आहे.

धीरेंद्र शास्त्री ज्या राज्यातील आहे, त्या राज्यातील महान सेनानी छत्रसाल बुंदेला यांना छत्रपती शिवाजी महाराजांनी मुघलांशी लढून स्वतंत्र राज्य स्थापन करण्याची प्रेरणा दिली होती. हा स्वतःच्या राज्याचा इतिहास माहिती नसणारा व्यक्ती महाराष्ट्रात येऊन छत्रपती शिवाजी महाराजांचा कपोलकल्पित आणि दिशाभूल करणारा इतिहास सांगतो, लढाया करून महाराज थकले म्हणतो आणि लोक त्याच्या समोर बसून टाळ्या वाजवजात, राज्यात त्याचे मोठमोठे कार्यक्रम घेतात, हे अत्यंत दुर्दैवी आहे, असे संभाजी छत्रपती यांनी म्हटले आहे. अशा भोंदू बाबांना मोठे करणाऱ्या लोकांना आणि राजकारण्यांना सरळ केले पाहिजे. राज्य शासनाने या भोंदू बाबाला राज्यात कार्यक्रम घेण्यास बंदी घालावी, अशी मागणी देखील संभाजी छत्रपती यांनी केली आहे.

धीरेंद्र शास्त्री आपल्या कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराज व रामदास स्वामी यांच्या कथित भेटीवर भाष्य करताना म्हणाले होते, सततच्या युद्धामुळे छत्रपती शिवाजी महाराज जेव्हा खूप थकले, तेव्हा ते एकेदिवशी रामदास स्वामी यांच्याकडे गेले. तिथे त्यांनी आपला मुकूट काढला आणि म्हणाले, आम्ही खूप युद्ध लढले. आता आम्हाला आणखी लढायचे नाही. आता आमच्यावर एक मोठी दया करा, हा माझा मुकूट तुम्ही सांभाळा. हा राजपाठही तुम्हीच सांभाळा. तुमच्या आज्ञेनेच आम्ही इथपर्यंत वाटचाल केली. आता आम्हाला चालणे अवघड झाले आहे.

आता आम्हाला युद्ध लढणेही होत नाही. आता आम्ही खूप थकलो. आता आम्हाला विश्रांतीही हवी आहे. आता आम्हाला आराम करायचा आहे. आता आम्हाला काही दिवस काहीच करायचे नाही, असे शिवाजी महाराज रामदास स्वामींना म्हणाले. त्यावर रामदास स्वामींनी त्यांची समजूत काढली आणि त्यांना उपदेश केला, असे बागेश्वर बाबा म्हणाले.


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क | एम.फिल-पी.एच.डी. थेसिस | मराठी, हिंदी, इंग्रजी | कलर प्रिंट स्कॅनिंग | झेरॉक्स | स्पायरल बायंडिग | लॅमिनेशन | थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103